जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक -२९५ दिनांक -२४/०७/२०२४

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

### कोंढवा परिसरात रिक्षा चोरणा-या सराईत चोरट्यास कोंढवा तपास पथकाडून अटक

दि.१२/०७/२०२४ रोजी फिर्यादी यांनी त्यांची ८०,०००/- रू किं ची बजाज कंपनीची रिक्षा ही प्रमिला अपार्टमेंटच्या बाहेर, सिग्नेचर हॉटेल शेजारी, लुल्लानगर चौक जवळ, कोंढवा खुर्द पुणे येथील रोडलगत लॉक व पार्ककरून सदर परिसरात फोनवर बोलत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांची रिक्षा चोरी करून नेले बाबत कोंढवा पोस्टे पुणे शहर येथे गु.र.नं. ८४१/२०२४ भा.न्या.सं. अधि. २०२३ चेकलम. ३०३(२)अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा घडल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संतोष सोनवणे, यांचे मार्गदर्शनाखाली कोंढवा तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. बालाजी डिगोळे व तपास पथकातील अंमलदार यांनी तपास सुरू केला.

दि. २०/०७/२०२४ रोजी पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे हे स्टाफ सह गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असताना येवलेवाडी, कामठे पाटीलनगर येथे आले असता एक इसम सदर गुन्ह्यामध्ये चोरीस गेलेली बजाज कंपनीची काळ्या व पिवळ्या रंगाची रिक्षा चालवित असताना दिसून आल्याने सदर इसमास ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव **संदिप बबन गोसावी, वय ३५ वर्षे, रा. जिल्हा परिषद शाळे समोर, येवलेवाडी, कोंढवा बु., पुणे मुळ रा. रूमनंबर ५६,श्री कृपा सोसायटी, गुरूदत्त मंडळ,पार्क साईड, विक्रोळी पश्चिम, मुंबई** असे असल्याचे सांगितले त्याच्याकडे असलेल्या रिक्षाबाबत अधिक तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे मान्य केल्याने त्यास दाखल गुन्ह्यामध्ये अटक करून त्याचे ताब्यातून २५,०००/- रू किं ची एक काळ्या व पिवळ्या रंगाची रिक्षा ही जप्त करण्यात आलेली असून सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान आरोपी याने कोंढवा पो स्टे गु.र.नं. ८१७/२०२४ भा.न्या.सं. अधि. २०२३ चे कलम. ३०३(२) व कोंढवा पो स्टे गु.र.नं. ३२६/२०२४ भादंविकलम ३७९ हे गुन्हे केल्याचे ही तपास दरम्यान निष्पन्न झाले आहे.

सदरील कारवाई ही मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-५,श्री आर.राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग श्री.धन्यकुमार गोडसे,कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ,श्री संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री मानसिंग पाटील, व श्रीमती रूणाल मुल्ला, यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढवा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे पोलीस अंमलदार सतिश चव्हाण, विशाल मेमाणे, निलेश देसाई, गोरखनाथ चिनके, लक्ष्मण होळकर, शाहिद शेख, सुजित मदन, सुरज शुक्ला, सागर भोसले व अनिल बनकर यांनी केली आहे.

